# स्पर्श

प्रकाशित: शिवस्पर्श दिवाळी अंक २०१३

**रत्नाकर वाणी**

पुनरारंभ

© पुनरारंभ

website: http://www.rajratna.co.in Email: ratnakar.wani@rajratna.co.in

# स्पर्श

नुकताच पाउस पडल्यामुळे धरणी मातेच्या पोटात विसावलेली सुप्त बीजे पाणी रूपी नवसंजिवनी मिळताच अंकुर धारण करून अवनीवरती अवतरले. बघता बघता सर्व रान, शेत, डोंगर माथा, कडे कपारी धरणी मातेने हिरवी शाल पांघरावी, सर्वदूर हिरवा गार गालिचा अंथरावा तशी सर्वत्र हिरवी गार  दिसू लागली. ती हिरवळ पाहून मन प्रसन्न झाले नाही तर नवलच.

छोटी मिनी अंगणात खेळत होती. खेळता खेळता तिचा हात सहजच एका लाजाळूच्या छोटया खुरटया हिरव्या रोपास लागला. मिनीचा स्पर्श होताच त्याची पाने मिटली व पुन्हा थोडया वेळाने पुर्ववत उलगडली. त्याच्या शेजारीच तसेच एक अजून लाजाळूचे खुरटे रोप होते. मिनीने कुतुहला पोटी त्याच्या पानास पण स्पर्श केला तशी त्याची पाने पण मिटली व पुन्हा पुर्ववत होउ लागली. मिनीला त्याची गंमत वाटली. तिला हा छंदच लागला व हिच क्रीया सारखी सारखी करू लागली. केवळ एका स्पर्शाने होणारी गंमत म्हणून तिने तिच्या सर्व मैत्रिणींना सांगितली.

एवढयात शाळेची वेळ झाली म्हणून मिनीच्या आईने तिला हाक दिली, “ मिने, ए ऽ ऽ ऽ मिने शाळेत जायचे की नाही? चल ये घरात. लवकर आटोप.” पण आईचे म्हणणे एका आरोळीत ऐकेल ती मिनी कसली. ती आपली मैत्रिणींसगे खेळण्यात दंग होती. न राहवून मिनीची आई बाहेर आली व खेळण्यात दंग असलेल्या मिनीच्या पाठीत एक धपाटा घालून तिला घरात घेउन गेली. आईने घातलेला धपाटा मिनीला काही नविन नव्हता. त्या धपाटयाच्या स्पर्शामागे धाक होता शिस्त होती. कशीबशी मिनीला आंघोळ, वेणी, फणी करून शाळेस तयार केल्यावर थोडयावेळाने पुर्वीचा राग विसरून आईने तिच्या डोक्यावर अलगद प्रेमाने हात फिरवीत तिला खाउ घातले, दुध पिण्यास दिले. या प्रेममय स्पर्शामध्ये तिचे प्रेम, माया व आपुलकी होती.

शाळेत जाण्यासाठी शाळेची बस आली. बसमध्ये चढविण्यासाठी महिला मदतनीस मावशीने तिला हात धरून वर घेतले. बसमध्ये विद्यार्थ्यांना व्यवस्थित बसविणे त्यांना बसविणे स्टॉप आल्यावर काळजी पूर्वक उतरविणे हे मावशींचे नित्याचे काम. मावशीच्या हाताच स्पर्श पण मिनीला नविन नव्हता. त्या स्पर्शामध्ये थोडी माया, कर्तव्य भावना तसेच दक्षतेचा अंश होता. शाळेत शिकवितांना शिक्षक शिक्षिकांचा वेळोवेळी झालेला स्पर्श हा, मी या बालकाला ज्ञानार्जन करून शिक्षित करिनच अशी दृढ भावना मनाशी बाळगूनच झालेला हा शिस्तपूर्ण ध्येयवादी स्पर्श.

पण वेळ कोणावर कधी कशी येईल हे सांगता येत नाही. मिनी दुपारच्या सुटी मध्ये मैत्रिणीं बरोबर शाळेच्या गेट जवळ खाउ आणण्यास गेली. त्याच वेळी एक दोघेजण तिच्या जवळ येत तिला विचारले, “ बाळ या शाळेजवळ गणपति मंदिर काठे आहे? ” मिनी सहज भोळया भावनेने म्हणाली, “ ते काय तिकडे पलिकडे झाडाजवळ.” जाणते असून अजाण बनत ते तिला म्हणाले, “ आमच्या बरोबर येउन आम्हाला दाखवशिल जरा.” तिच्या हो, नाहीच्या उत्तराची वाट न पाहता त्यातील एकाने जवळ जवळ जबरदस्ती करित तिच्या दंडाला पकडले व मोटरसायकलवर बसवू लागला. त्यावेळचा त्याचा तो राकट, दुष्ट बुध्दीने केलेला, दुष्टभावना प्रेरित पापी स्पर्श. पण सुदैवाने त्याच वेळी गस्तीवरील महिला पोलीसांनी केलेली तिची सुटका. सुटके निमित्त त्यांचा झालेला कर्तव्यदक्ष, मवाळ व एका स्त्रीने दुस–या स्त्रीचे जाणलेले दुःख. असा विविध भावना युक्त स्पर्श.

बघता बघता मिनी ची मिनाक्षी झाली. पदवीच्या शिक्षणा करता ती महाविद्यालयात जाउ लागली. बसने महाविद्यालयाला जाताना गर्दीमध्ये तिच्या शेजारी एक तरूण बसला. सुरवातीला सहजच तिच्या दंडाला स्पर्श झाला.

नंतर कधी गाडी हलल्याचा तर कधी चालकाने ब्रेक दाबल्याची संधी साधत तो जाणून बुजून तिला स्पर्श करू लागला. त्यावेळी तिला नकोसे वाटले. परंतु गाडीला गर्दी असल्यामुळे सहन करण्या पलिकडे ती काहीच करू शकत नव्हती. प्रवासा दरम्यान कधी कळत न कळत तर कधी हेतुपुरस्सर झालेले अनोळखी, ओंगळवाणे, नकोसे वाटणारे व शिसारी आणणारे स्पर्श.

घरी येउन मिनाक्षीने बसमधला प्रसंग आईला कथन केला. त्यावर आईने सहानुभुतिपूर्वक तिच्या दंडावर व हातावर मउ हळूवार हाताने हात फिरवित परस्पर्श पुसण्याचा केलेला, हवाहवासा वाटणारा, आईचा मायेचा प्रेमळ स्पर्श. बाबांनी पितृछायेचा आधार असल्याची ग्वाही देत डोक्यावर हात ठेवित जिवनात खंबीर व कणखर होण्याची गरज असल्याचा संदेश देणारा धीराचा धीरोदत्त स्पर्श. कॉलेजमध्ये मित्र मैत्रिणींना हसी मजाक करित एकमेकास टाळी देत व कॉलेज जिवनाचा आनंद उपभोगत झालेला मित्रप्रेमाचा स्पर्श.

बोलता बोलता कॉलेज जिवनाचे चार वर्षे कशी निघून गेली ते तिला कळलेच नाही. मिनाक्षी पदवीधर झाली. आई बाबांना वेध लागले ते तिच्या लग्नाचे, तिला हळद लावण्याचे, दोनाचे चार करण्याचे. आई बाबानी तिच्यासाठीं एका सुंदर देखण्या पदविधर तरूणाचे स्थळ शोधले.मनपसंत स्थळामुळे ती सुखावली. त्याचेशी वार्तालाप करतांना झालेला स्पर्श. त्याच्या स्पर्शाने तिच्या अंगावर रोमांचकारी शहारे आले. त्याचा तो प्रेमयुक्त प्रेमी स्पर्श तिला हवाहवासा वाटला. मनाला अंतरिक वेड लावून पुनर्भेटीची ओढ लावून गेला. देवा ब्राम्हणांच्या साक्षीने व थोरा मोठयांच्या आशिर्वादाने मिनाक्षीची सौ.मिनाक्षी झाली. गगनाला आधार नाही आनंदाला पारावार नाही अशी तीची स्थिती झाली. आणखी एक स्पर्श सौख्याची बरसात करित बाळाची चाहूल लाउन गेला. अतिकोमल फुलाला लाजविल अशा नवजात बाळाचा स्पर्श मातेला सुखावून गेला. बाळाच्या कोमल नाजूक हळूवार स्पर्शाने मिनाक्षीचे जिवन खुलले. तिला गगन ठेंगणे झाले, जिवन कृतार्थ झाले.

शब्दावाचून शब्दाच्या पलिकडले सांगणारे स्पर्श एकच, फक्त वेळेनुरूप, प्रसंगानुरूप त्याचे अर्थ वेगळे भाव वेगळे. वर्षाऋतुतील पहिल्या पावसाच्या थेंबाच्या स्पर्शाने निसर्ग खुलवून टाकणारा मनास उल्हसित करणारा पण स्पर्शच. महाराष्ट्राच्या पावन भुमिला छत्रपति शिवाजी महाराजांच्या पावन पदस्पर्शाने झालेला तो शिवस्पर्श.

स्पर्श स्पर्श स्पर्श.